# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३०/१०/२०२४ (बुधवार) सायंकाळ**

---

## पोस्टे काटोल हद्दीतील घुबडमेट, खानगाव पारधी बेडा तसेच पोलीस स्टेशन जलालखेडा हद्दीतील उमठा पारधी बेडा येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमांवर कायदेशिर कार्यवाही

आगामी विधानसभा निवडणुक या अनुषंगाने कोणतेही अनुचित प्रकार घडु नये या करीता सुरक्षेतेच्या दृष्टीकोणातून मा. पोलीस अधिक्षक साहेब नागपुर जिल्हा नागपुर ग्रामिण याचे आदेशाने दि. २८/१०/२०२४ रोजी पोलीस ठाणे काटोल हद्दीतील घुबडमेट, खानगाव पारधी बेडा तसेच पोलीस स्टेशन जलालखेडा हद्दीतील उमठा पारधी बेडा येथे मोहाफुल गावठी दारू काढणारे इसमांवर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारे ०४ महिला आरोपी तसेच **आरोपी नामे— १) प्रमोद देवमान सोळंकी वय ३५ वर्ष खानगाव पारधी बेडा जि. नागपुर २) नितेश रवी पवार वय २७ वर्ष घुबडमेट** हे मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिग भट्टी काढतांना मिळुन आली. आरोपींचे ताब्यातून १) २४० लिटर मोहफुल गावठी दारू किमती २४०००/—रु २) मोहाफुल रसायन सडवा एकूण ६२४० लिटर एकूण किमती २१८४००रु ३) भट्टी काढण्याचे साहित्य किंमती व इतर दारू गळण्याचे साहित्य असा एकूण ३४०००रु असा एकुण २७६४००/—रू चा मुद्देमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. जप्त मुद्देमाल नाश करून सॅम्पल व कागदपत्र पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे काटोल तसेच पोलीस स्टेशन जलालखेडा यांचे ताब्यात देण्यात आले. त्याचे विरुद्ध कलम ६५( फ, क, ब, ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर